क्रमांक ९५२८८ /ड-२०
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : 9 OCT 2025

प्रति,

विधानपरिषद व विधानसभेचे
सर्व सन्माननीय सदस्य

विषय : जगदगुरुत्तम सेवा समितीव्दारे आयोजित करण्यात येत असलेल्या निसर्गोपचार आणि समग्र कल्याण शिबीराच्या माहितीबाबत

आदरणीय महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास निदेशानुसार कळविण्यात येते की, जगदगुरुत्तम सेवा समिती, यांचेव्दारे उच्च रक्तदाब, मधुमेह आणि उच्च कोलेस्ट्रॉल या सारख्या जीवनशैलीशी संबंधित आजारांना प्रतिबंधीत करणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे यासाठी मोफत निसर्गोपचार आणि समग्र कल्याण शिबीरे (१) **श्री कृष्ण शरणम सोसायटी, प्लॉट क्र. १२ - अ, चटीकरा रोड (कृपालु मार्ग), वृंदावन, मथुरा, उत्तर प्रदेश (२) टल्ला बनास, किमसर रोड, ता. यमकेश्वर, जि. पौरी गढवाल, ऋषिकेश, उत्तराखंड** येथे आयोजित करण्यात येतात. प्रत्येक महिन्यात ३ वेळा ही शिबीरे आयोजित करण्यात येत असून या शिबीराचा कालावधी ५ दिवसांचा असतो. या शिबीरात एका वेळी ३० व्यक्तींचा समावेश करण्यात येतो. या शिबीरातील नैसर्गिक उपचार, आरोग्य प्रशिक्षण, निवास व भोजन व्यवस्था जगदगुरुत्तम सेवा समितीकडून नि:शुल्क करण्यात येते.

याअनुषंगाने मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे निदेशाचे अधिनतेने आपणास अवगत करण्यात येते की, या शिबीरास जे सन्मा. सदस्य उपस्थित राहू इच्छित आहेत त्यांनी या शिबीरांच्या नांव नोंदणीसाठी व शिबीरांसंदर्भातील अधिक माहितीसाठी जगतगुरुत्तम सेवा समितीचे **मुख्य कार्यकारी अधिकारी कॅप्टन प्रंभान्सू कुमार श्रीवास्तव (आय.ए.एस (निवृत्त), भ्रमणध्वनी क्रमांक ९५६८८२२०००), वृंदावन येथील शिबीरासंबंधी माहितीसाठी श्री. इंद्र मोहन सरीन (भ्रमणध्वनी क्रमांक ८३६८५२८५००) व ऋषिकेश येथील शिबीरासंबंधी माहितीसाठी श्री. शिवा कुमार (भ्रमणध्वनी क्रमांक ९५८२५५५२३७)** यांच्याशी संपर्क साधावा.

शिबीरास उपस्थित राहणाऱ्या सन्मा. सदस्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी, ही विनंती.

आपला,

( डॉ. विलास आठवले )
सचिव ३
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

याची प्रत माहितीसाठी :-

१. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
२. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३. मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
५. सचिव- १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६. सचिव- २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७. सचिव- ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८. सचिव- ४ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
९. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी
१०. श्री. राधेश्याम कथोरीया, अध्यक्ष, जगदगुरुत्तम सेवा समिती, ५३- सी, पीकेटी- डी, दिप एन्क्लेव्ह, अशोक विहार, फेस ३, नवी दिल्ली - ११००५२.
११. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

E:\Letter New Final.docx